प्रबोधन

गोरेगाव

# वीसावा वार्षिक अहवाल

१९९२ - ९३

# प्रबोधन गोरेगाव

## प्रबोधन क्रीडाभवन

सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४

### २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा

'प्रबोधन गोरेगाव' या संस्थेची २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १८ डिसेंबर १९९३ रोजी रात्रौ ९.०० वाजता, प्रबोधन क्रीडाभवन, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज**

१. प्रास्ताविक
२. सन १९९१-९२ सालच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचन व त्यास मंजूरी देणे.
३. १९९२-९३ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद (हिशेब तपासनीसांच्या अहवालासह) वाचून मंजूर करणे.
४. नवीन वर्षाकरिता (१९९३-९४) घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे. (एकूण ६ जागा)
५. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.
६. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरून

**गिरीश देसाई**

कार्याध्यक्ष

**डॉ. मनोहर अदवानकर**

प्रमुख कार्यवाह

दि. २० नोव्हेंबर १९९३
गोरेगाव, मुंबई - १०४

---

१) संस्थेचा जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ प्रबोधन क्रीडाभवन, सिद्धार्थनगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४, येथील संस्थेच्या कार्यालयात दि. १०-१२-९३ ते १४-१२-९३ पर्यंत रोज संध्याकाळी ६ ते ७ पर्यंत ठेवण्यात येईल.

२) कोणाही सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक १२-१२-९३ पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.

३) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

४) निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. १५-१२-९३ पूर्वी संस्था कार्यालयात संध्या. ६ ते ७ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमूना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# प्रबोधन, गोरेगाव

२०वा वार्षिक अहवाल

१९९२ - १९९३

**'प्रबोधन-गोरेगाव'** या संस्थेच्या कार्याचा दि. १ एप्रिल १९९२ ते ३१ मार्च १९९३ या कालावधीचा अहवाल व हिशोब पत्रके संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सादर करताना संस्थेच्या कार्यकारी मंडळास समाधान वाटत आहे.

या वर्षीच्या अहवाल वर्षात संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या एकूण १० सभा घेण्यात आल्या व स्वीकृत सभासदांसह कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संख्या १४ एवढी होती.

## 'प्रोजेक्ट : २०००' महत्त्वाकांक्षी प्रकल्प

दर चार वर्षांनी भरणारे ऑलिम्पिकचे सामने असोत किंवा इतर कोणत्याही जागतिक स्तरावरील स्पर्धा असोत, आपला अनुभव असा आहे कि, भारतीय संघ व खेळाडू नेहमीच रिकाम्या हाताने परततात. काही वर्षांपूर्वी भारतीय संघास ऑलिम्पिकमध्ये हॉकीचे एकुलते एक 'सुवर्णपदक' मिळत असे. परंतु कालांतराने युरोपियन संघांनी त्या खेळावर वर्चस्व मिळाल्यावर तेही भारतीय संघास मिळवता येईनासे झाले व ऑलिम्पिकहून परतणाऱ्या भारतीय संघास निराशा पदरी घेऊनच परतावे लागत आहे व पदकांच्या तक्त्यात भारतीय खेळाडूंची पाटी सदैव कोरीच राहिली. हा दोष क्रीडापटूंचा मुळीच नाही. आपल्या क्रीडापटूंकडे नैपुण्य आहे. शारीरिक क्षमता आहे, वानवा आहे ती प्रशिक्षणाची व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाची. त्याचप्रमाणे या सर्वांसाठी लागणाऱ्या पैशाची. आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडापटू निर्माण होण्यासाठी खेळाडूंना लहानपणापासूनच शास्त्रशुद्ध शिक्षण द्यावे लागते व पूर्ण वेळ खेळाडूंनी खेळासाठी व त्या खेळाच्या सरावासाठी वाहून घ्यावे लागते; तरच त्या खेळात प्राविण्य मिळवता येते. अशा खेळाडूंचा उमेदीचा काळ संपल्यावर त्यांची परवड होऊ नये यासाठी सरकारने व मोठ्या उद्योगसमूहांनी त्या खेळाडूंच्या उर्वरित आयुष्याची तजवीज करणे जरूरीचे आहे. आजवरचा आपला अनुभव असा की, अशा खेळाडूंचा उमेदीचा काळ संपला की शिक्षण नसल्याने व नोकरी नसल्याने त्या खेळाडूंची परवड होत असे. याला अपवाद फक्त क्रिकेट कसोटीपटूंचा. परंतु सध्याचे केंद्र सरकारचे धोरण बदलले आहे. खेळ हा सुद्धां शालेय अभ्यासक्रमात एक विषय म्हणून समाविष्ट केला गेला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक दर्जेदार खेळाडू निर्माण होतील अशी अपेक्षा आहे.

वरील सर्व गोष्टी नजरेसमोर ठेवून **'प्रबोधन'** ने जागतिक दर्जाचे खेळाडू निर्माण करण्याची उमेद बाळगली व त्यादृष्टीने करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून संस्थेने **'प्रोजेक्ट २०००'** या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची आखणी केली व तो प्रकल्प राबविण्यास सुरूवात केली. या प्रकल्पांतर्गत **''प्रबोधन आंतरशालेय क्रीडा महोत्सवा''** त विशेष नैपुण्य

इतर गुणवंत विद्यार्थी खालीलप्रमाणे -

मराठी - अ.भि. गोरेगावकर इं.स्कुल
**कु.नारायण पर्शुराम शेटकर**

इंग्रजी व संस्कृत --नंदादीप विद्यालय.
**कु. प्रांजली पांगारकर-**

हिंदी- कुलदीपसिंग दीवाण हायस्कूल
**कु. शैलेंद्र मोसमकर**

समाज- नंदादीप विद्यालय.
शास्त्र - **कु. आनंद ताबडे व**
**कु. स्वाती राऊत -**

शास्त्र - अ.भि. गोरेगावकर इं. स्कुल
**कु. सत्यजित शहा**

गणित - नंदादीप विद्यालय
**स्वाती राऊत -**
**तेजल गिंडे**
**प्राजली पांगारकर**

गणित - आदर्श विद्यालय
**राजश्री माने -**
**महेंद्र राबतोळे -**

गणित - अ.भि. गोरेगावकर
**संपदा कर्वे**

**गुणवत्ता यादीत आल्याबद्दल 'प्रबोधन गोरेगाव' तर्फे रोख रु. १०१/-**

१) **स्वाती राऊत** नंदादीप विद्यालय
२) **स्वाती खरे** -''-
३) **प्रांजली पांगारकर** -''-
४) **तेजल गिंडे** -''-
५) **नारायण शेटकर** अ.भि. गोरेगावकर इं.स्कुल
६) **तृप्ती पाटील** -''-

## जिल्हा पातळीवरील व्हॉलीबॉल स्पर्धा

प्रबोधन क्रीडाभवनाच्या मैदानावर दि. २५ मे ते ३० मे १९९२ या दरम्यान जिल्हा पातळीवरील व्हॉलीबॉल स्पर्धा, गोरेगाव स्पोर्टस् क्लबच्या सहकार्याने घेण्यात आल्या. दि. २५ मे १९९२ रोजी उद्घाटन झाल्यावर या स्पर्धा सतत ७ दिवस विद्युत प्रकाशझोतात खेळविण्यात आल्या. या स्पर्धेस अनेक मात्तब्बर संघाचा व अनेक मान्यवरांचा सहभाग लाभला. दि. ३१ मे १९९२ रोजी आमदार व शिवसेना नेते ॲड. **लिलाधर डाके,** यांच्या शुभहस्ते या शानदार स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा, पार पडला. त्याप्रसंगी **श्री. के.के. जैन,** कार्यवाह, गोरेगाव स्पोर्टस् क्लब, **श्री. बसंत गाला, श्री. जे.एन्. अग्रवाल,** संचालक, ज्योती मिक्सर ग्राइंडर, **श्री. चंदूभाई शहा,** आशीर्वाद या स्टोर्सचे मालक, **श्री. कदम,** ग्रॉडफ्रे फिलीप्स्, **श्री. आर.एस्. पाठारे,** आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पंच, त्याचप्रमाणे गोरेगावचे आमदार **श्री. सुभाष देसाई** व इतर मान्यवर उपस्थित होते.
स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :-

विजेता संघ : आर.सी.एफ.संघ
(रु.४,०००/-)
उपविजेता संघ : पश्चिम रेल्वे संघ
(रु.२,०००/-)
तृतीय पारितोषिक ओ.एन.जी.सी.संघ
विजेता संघ :
(रु.१,०००/-)

त्याच प्रमाणे प्रत्येक विजेत्या संघास स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले

## उन्हाळी क्रिकेट प्रशिक्षण वर्गाचा समारोप

दि. १ जानेवारी १९९२ पासून प्रबोधन क्रीडाभवनातील सर्व सुविधा सुरू झाल्या. त्याचबरोबर क्रिकेटसारखे मैदानी खेळही सुरू करण्यात आले. त्यासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली **'प्रबोधन क्रीडाभवना'**च्या मैदानावर क्रिकेटची खेळपट्टी तयार करण्यात आली व खेळाडूंसाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण शिबिरे व वर्ग सुरू करण्यात आले. मे महिन्याच्या उन्हाळी सुट्टीत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले. उन्हाळी प्रशिक्षण वर्गांचा शंभराहून अधिक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. या वर्गाचा समारोप दि. ३० मे १९९२ रोजी करण्यात आला. त्याप्रसंगी **श्री. प्रदीप विजयकर,** 'टाइम्स् ऑफ इंडिया' चे क्रीडासमीक्षक, प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते.

## खो - खो स्पर्धा

'प्रबोधन क्रीडाभवना' ने पश्चिम उपनगरातील खेळाडूंमध्ये आदराचे स्थान मिळविले आहे, हे नमूद करण्यास आम्हांस अत्यानंद होत आहे. या क्रीडाभवनात शालेय व महाविद्यालयीन, विद्यार्थ्यांसाठी खो-खो, कबड्डी, कराटे, जिम्नॅस्टिक, ॲथलेटिक्स् यासारख्या व प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे, योग, हेल्थ सेन्टर, कॅरम व टेबलटेनिस यासारख्या खेळांच्याही सुविधा उपलब्ध आहेत. या सर्व सोयींच्या उपलब्धतेमुळे हे क्रीडाभवन पश्चिम उपनगरातील क्रीडापटूंसाठी एक सराव केंद्राचे आशास्थान झालेले आहे. क्रीडाभवनाच्या पूर्णपणे सुसज्ज व समतल अशा मैदानावर खो-खो कबड्डी सारख्या भारतीय मैदानी खेळांच्या सरावासाठी व स्पर्धा आयोजनासाठी सतत विचारणा होत असते.

क्रीडाभवनाच्या मैदानावर महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागातर्फे पूर्व/पश्चिम उपनगरातील शालेय विद्यार्थ्यांच्या मुंबई उपनगर जिल्हा पातळीवरील खो-खो निवड स्पर्धा ४ ते ९ सप्टेंबर १९९२ या दरम्यान घेण्यात आल्या. या क्रीडास्पर्धांस भरघोस प्रतिसाद लाभला.

## वृक्षारोपण समारंभ

तरूणांना विशेषतः विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाचे महत्त्व पटावे त्याचप्रमाणे पर्यावरण संतुलनच्या दृष्टीनेसुद्धां महत्त्वाचा असा वृक्षारोपण समारंभ साजरा व्हावा या दृष्टीकोनातून दि. १६ सप्टेंबर १९९२ रोजी वृक्षारोपण समारंभाचे आयोजन करण्यात आले. त्याप्रसंगी आदर्श विद्यालय, सेन्ट जोन्स् हायस्कूल, सिद्धार्थ नगर म्युनि. शाळा, मोतीलाल नगर म्युनि. शाळा या शाळेतील विद्यार्थी/विद्यार्थिनींची वृक्षदिंडी आय्.बी. पटेल म्युनि. शाळेपासून क्रीडाभवनापर्यंत काढण्यात आली. त्याचप्रमाणे त्या मुलांनी कवायतीचे प्रात्यक्षिक करून दाखविले. प्रबोधनच्या कराटे चमूनेही कराटेचे प्रात्यक्षिक ही दाखविले. त्याचदिवशी प्रबोधन क्रीडाभवनाच्या चहूबाजूंनी २०० वृक्षांची लागवड करण्यात आली. त्याप्रसंगी **श्री. शरद काळे,** बृहन्मुंबई महानगर पालिका आयुक्त, **श्री. शाहू डांगे,** बृहन्मुंबई महानगरपालिका उपायुक्त परिमंडळ

उद्‌घाटन सोहळ्यास प्रबोधन क्रिकेट विभागाचे संचालक व माजी क्रिकेट कसोटीपटू **श्री. अजित पै,** आमदार **श्री. सुभाष देसाई,** संस्थेचे अन्य पदाधिकारी, क्रिकेट प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## जिल्हा मल्लखांब अजिंक्यपद स्पर्धा

महामुंबई विभाग मल्लखांब संघटना व प्रबोधन गोरेगाव आयोजित अकराव्या वार्षिक अजिंक्यपद व निवड स्पर्धा दि. ३०,३१ ऑक्टोबर व १ नोव्हेंबर १९९२ रोजी प्रबोधन क्रीडाभवनात पार पडल्या. बृहन्मुंबईतील एकूण १६ संस्थांमधील २५० हून अधिक स्पर्धकांनी सतत तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या कांही स्पर्धकांची व पंचांची रहाण्याची सोय संस्थेतर्फे विनामूल्य करण्यात आली होती. जुन्या पिढीतील तज्ञ क्रीडा प्रशिक्षक व व्यायामतज्ञ **श्री. गो.ना. पुरंदरे** यांनी दि. ३० ऑक्टोबर १९९२ रोजी या स्पर्धेचे औपचारिक उद्‌घाटन केले. या स्पर्धेत स्पर्धकांनी मल्लखांबावरील त्याचप्रमाणे योगासनातील आपल्या नैपुण्याचे प्रदर्शन करतांना रसिकांच्या डोळ्याचे पारणे फेडले. 'योगासने-महिला' या प्रकारात आपल्या नैपुण्याचे प्रदर्शन करताना प्रबोधन संघाच्या मीना बंगेरा ने सुवर्णपदक पटकाविले.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ महाराष्ट्र राज्याचे तत्कालिन गृहनिर्माण व राज्यशिष्टाचार मंत्री **श्री. जावेदखान** यांच्या हस्ते दि. १ नोव्हेंबर १९९२ रोजी पार पडला. विजेत्या स्पर्धकांनी मल्लखांब व योगासनांची प्रात्यक्षिके प्रमुख पाहुण्यांसमोर सादर केली. त्याप्रसंगी बोलतांना, संस्थेचे प्रमुख कार्यवाह **डॉ. मनोहर अदवानकर** यांनी 'गोरेगाव पश्चिमेस असलेल्या ६ अन्य क्रीडांगणांचा विकास करण्यासंबंधी,' माननीय मंत्रीमहोदयांना निवेदन केले व मंत्री महोदयांनीसुद्धा ते तत्त्वतः मान्य केले.

## पंधरावा आंतरशालेय क्रीडामहोत्सव

पंधरा वर्षापूर्वी संस्थेने सुरू केलेल्या या क्रीडामहोत्सवास सतत वाढता प्रतिसाद लाभत आहे. यंदाच्या वर्षीचा क्रीडामहोत्सव दि. २० ते २२ डिसेंबर १९९२ या कालावधीत प्रबोधन क्रीडाभवनाच्या क्रीडांगणावर आयोजित करण्यात आला. यंदाच्या क्रीडा-महोत्सवच्या आयोजनातूनच **'प्रोजेक्ट २०००'** या महत्त्वाकांक्षी उपक्रमासाठी विद्यार्थ्यांची निवड होणार असल्याचे जाहिर झाल्याने या क्रीडामहोत्सवास विद्यार्थ्यांची व पालकांची विशेष उत्सुकता लाभली होती. वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील ७९ शाळांतील ३५०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

या महोत्सवाचे उद्‌घाटन **श्री. सुरेश प्रभू,** अध्यक्ष व कार्यकारी संचालक दी सारस्वत को. ऑप. बँक लि., यांच्या शुभहस्ते दि. २० डिसेंबर १९९२ रोजी करण्यात आले. गतवर्षीच्या प्रबोधन क्रीडामहोत्सवात सर्वाधिक पदके मिळविणारी धावपटू प्रमिला शेट्टी हिने क्रीडाज्योत प्रज्वलीत केली. प्रबोधनच्या कुमारी हर्षा सडेकर विद्यार्थिनीने १९९१ साली बदलापूर येथे झालेल्या

सब-ज्युनियर राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी मुंबई उपनगर खो खो संघाचे कर्णधारपद भुषविले होते. कुमारी हर्षा सडेकरने अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल या शाळेच्या खो-खो मुलींच्या संघांतून खेळताना आपल्या शाळेस खो-खो मुलींचे अजिंक्यपद मिळवून देतांना गतवर्षीच्या विजेत्या परांपजे विद्यालयाचा १० गुणांनी पराभव केला, त्याचप्रमाणे अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूलने सर्वोत्कृष्ट संघासाठी असणारा प्रबोधन करंडकही पटकाविला.

या क्रीडामहोत्सवाच्या समारोपप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांची विद्युत् प्रकाशझोतातील आकर्षक अशी लोकनृत्य स्पर्धा सादर करण्यात आली, तर या क्रीडामहोत्सवाचा बक्षिस समारंभ मंगळवार दि. २२ डिसें. १९९२ रोजी गोरेगांव (पूर्व) येथील आमदार, प्रबोधनचे हितचिंतक व आजीव सभासद **श्री. गजानन कीर्तिकर** यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी हजारो विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक, शिक्षक व प्रेक्षक उपस्थित असल्याने, या क्रीडामहोत्सवास खरेखुरे महोत्सवी स्वरूप लाभले. याच समारंभात क्रीडा क्षेत्रातील अग्रणी **श्री. गोविंद नारायण पुरंदरे** यांनी संकलित केलेल्या 'जागतिक ऑलिम्पिक्स्' या अत्यंत माहितीपूर्ण पुस्तिकेचे प्रकाशन क्रीडामहर्षि श्री यशवंतराव गोळे यांच्या हस्ते करण्यात आले.

## १५ वा आंतरशालेय क्रीडामहोत्सव

सर्वोत्कृष्ट संघासाठी असलेला प्रबोधन फिरता करंडक अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल गोरेगाव. .

### कबड्डी (मुले)

विजेता संघ : नंदादीप विद्यालय, गोरेगाव.

उपविजेता संघ : कुलदीपसिंग दिवाण हायस्कूल, गोरेगाव.

### कबड्डी (मुली)

विजेता संघ : आय्.ई.एस्. सेकंडरी स्कूल, चारकोप.

उपविजेता संघ : कुलदीपसिंग दिवाण हायस्कूल, गोरेगाव.

### खो-खो (मुले १७ वर्षाखालील)

विजेता संघ : अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव

उपविजेता संघ : आदर्श विद्यालय, गोरेगाव.

### खो-खो (मुली १७ वर्षाखालील)

विजेता संघ : अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव.

उपविजेता संघ : परांजपे विद्यालय, अंधेरी.

### ॲथलेटिक्स् स्पर्धा :

विजेता संघ : सेन्ट लॉरेन्स् हायस्कूल दहिसर
(५ सुवर्ण, २ रौप्य व २ कास्य पदके)

उपविजेता संघ : अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव
(२ सुवर्ण, २ रौप्य, व २ कास्यपदके)

### लोकनृत्य स्पर्धा :

विजेता संघ : बॉम्बे केम्ब्रिज स्कूल, अंधेरी

उपविजेता संघ : कनोसा हायस्कूल, अंधेरी.

## सांघिक कवायत स्पर्धा

विजेता संघ : सेन्ट झेवियर्स हायस्कूल अंधरी

उपविजेता संघ : सेन्ट थॉमस हायस्कूल, गोरेगाव.

## एस्.एस्.सी. व्याख्यानमाला

संस्थेने आपल्या स्थापनेपासूनच सुरू केलेली ही व्याख्यानमाला सातत्याने २० व्या वर्षीही आयोजित करण्यात आली. यंदाच्या वर्षीची ही व्याख्यानमाला दि. ८ ते १५ फेब्रुवारी १९९३ या दरम्यान पाटकर महाविद्यालयात आयोजित केली गेली. या व्याख्यान मालेचा लाभ गोरेगाव त्याचप्रमाणे इतर उपनगरातील हजारो विद्यार्थी / विद्यार्थिनींनी घेतला.

## एकविसावा वर्धापनदिन

यंदाच्या वर्षी वर्धापनदिनाची पर्वणी प्रबोधनच्या सभासदांना पुन्हा एकदा लाभली. गुढीपाडव्याच्या पूर्व संध्येस, मंगळवार दि. २३ मार्च १९९३ रोजी रात्रौ ९ वाजता रंगभवन, प्रबोधन क्रीडाभवन, येथे हा शानदार सोहळा संपन्न झाला. त्याप्रसंगी **'हिंदोळे स्वरांचे'** हा मराठी सुगम संगीताचा लोकप्रिय कार्यक्रम प्रबोधनच्या सभासदांसाठी विनामूल्य सादर करण्यात आला. वर्धापन दिनाच्या या समारंभास **श्री. विद्याधर गोखले,** प्रसिद्ध साहित्यिक व मराठी नाट्यपरिषदेचे अध्यक्ष प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित राहीले होते. **श्री. विद्याधर गोखले** यांच्या शुभहस्ते मराठीतील प्रसिद्ध लेखक **श्री. विश्वास पाटील** यांचा, त्यांच्या 'झाडाझडती' या पुस्तकास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल अत्यंत भावपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे याच समारंभात गोरेगावातील शालांत परिक्षेत विशेष प्राविण्य संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. त्यांची नांवे पुढीलप्रमाणे :-

गोरेगाव येथील मराठी माध्यमांच्या शाळांमधून शालांत परिक्षेत सर्वप्रथम आलेला विद्यार्थी धनंजय गजानन परूळेकर - सन्मित्र विद्यामंदिर.

| | |
|---|---|
| | नंदादीप विद्यालय |
| मराठी - | रूपाली गणपत सावंत, |
| इंग्रजी - | आशिष मनोहर अदवानकर |
| | अ.भि. गोरेगावकर |
| संस्कृत - | आदिती प्रकाश रेगे, |
| हिंदी - | अंजली वसंत कांबळे |
| | रूपाली शिवराम वारे |
| | नंदादीप विद्यालय |
| समाजशास्त्र - | प्राजक्त चंद्रकांत माहिमकर, |
| | अ.भि. गोरेगावकर |
| समाजशास्त्र - | नेहा सुरेश चौहान, |
| | नंदादीप विद्यालय |
| विज्ञान - | प्राजक्त चंद्रकांत माहिमकर, |
| विज्ञान - | कुलदिपसिंग दि. हायस्कूल |
| | लिना अनिल धुमक, |
| | अ.भि. गोरेगावकर |
| गणित - | निलेश विजय शृंगारपुरे |
| | विद्यावर्धिनी विद्यामंदीर |
| हिंदी/संस्कृत - | जयप्रकाश विनायक लब्दे |

## प्रबोधन बालवाडी

आर्थिकदृष्ट्या कमकुवत अशा समाजाच्या घटकांसाठी संस्थेने या बालवाडया जवाहर नगर, गोरेगव (पश्चिम) व कोयना नगर वसाहत, गोरेगाव (पूर्व) याठिकाणी सुरू केलेल्या आहेत. या बालवाड्यातून सुमारे दोनशे विद्यार्थ्यांना पूर्वप्राथमिक स्वरूपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात येते. मी बालवाडीतील मुलांना गोरेगावातील कोणत्याही मराठी माध्यमाच्या शाळेतून प्रवेश मिळू शकतो. प्रतिवर्षी बालवाडी साठी सारस्वत बँकेचे अर्थसहाय्य उपलब्ध होते हे नमूद करणे आवश्यक आहे. संस्था त्याबद्दल बँकेची सदैव ऋणी आहे.

## धन्यवाद व आभार

संस्थेच्या गेल्या २० वर्षांच्या वाटचालीत अनेक मान्यवर व्यक्ति, संस्था, पत्रकार, क्रीडासमीक्षक त्याचप्रमाणे संस्थेच्या सभासदांचे व अनेक कार्यकर्त्यांचे सतत सक्रीय व आर्थिक पाठबळ लाभले त्याचप्रमाणे त्यांचा संस्थेवरील लोभ सतत वृद्धिंगतच होत गेला, त्यामुळेच संस्थेस येथवर मजल मारता आली व **'प्रोजक्ट २०००'** सारखे महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करता आले व या सर्वांच्या पाठबळावरच ते पूर्ण करता येतील असा संस्थेस विश्वास वाटतो. त्या सर्वांचा उल्लेख करणे या ठिकाणी अशक्यच आहे. परंतु त्या सर्वांबरोबर असलेले ऋणानुबंध सतत वृद्धिंगतच होत राहोत असे आम्हांस मनापासून वाटते व ते ऋणानुबंध वृद्धिंगत होत राहतील, असा आम्हांस विश्वास वाटतो. स्वतःच्या नगरसेवक निधीतून प्रबोधन क्रीडाभवनाच्या निर्मितीसठी ज्या माननीय नगरसेवकांनी प्रत्येकी रू. ५०,०००/- (रूपये पन्नास हजार फक्त) दिले, त्या नगरसेवकांचे मनःपूर्वक आभार.

श्री. दिलीप लिलाणी
श्री. मधुकर राऊत
श्री. विनोद घोसाळकर
श्री. दिलीप नेरूरकर
श्री. कमलाकर पाटील
श्री. विजय दारूवाले
श्री. हरेश्वर पाटील
श्री. महादेव मोटे
श्री. गजानन ठाकरे
श्री. मोहन सुर्वे
श्री. मारुती खेडसकर
श्री. मधुकर बिर्जे
श्री.राजेश्वर रागिनवार
श्री. गुरूनाथ देसाई
श्री. अनंत गीते
श्री. जयवंत परब

आपले नम्र
कार्यकारी मंडळ (१९९२-९३)
प्रबोधन-गोरेगाव

# प्रबोधन गोरेगाव

***कार्यालय :*** प्रबोधन क्रीडाभवन, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४.
दूरध्वनी : ८७३ ४८ ६९

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. Bom. 46/72 GB BSD] मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था [Regn No. F 2502 Bom.]

१९९२ - ९३

अध्यक्ष : **श्री. निळकंठ ज. सावंत**
उपाध्यक्ष : **श्री. प्रभाकर मोडक** डी.एम्.इ., डी.इ.इ.
**श्री. पद्माकर देसाई** बी. एस्सी. (ऑ.)

**कार्यकारी मंडळ**

कार्याध्यक्ष : **श्री. गिरीश देसाई** डी.सी.ई.
प्रमुख कार्यवाह : **डॉ. मनोहर अदवानकर** एम्.एस्सी. पीएच्.डी.
सहकार्यावह : **श्री. श्रीनिवास शिरसेकर** जी.डी. आर्ट
: **श्री. नितीन शिंदे**
खजिनदार : **श्री. महादेव खानोलकर**

**सभासद**

**श्री. वसंत तावडे** बी.ए
**श्री. दिनकर मालवणकर**
**श्री. चंद्रकांत पोतदार**
**श्री. मिलींद डुंबरे** बी.कॉम्.
**श्री. समीर त्रैलोक्य** बी.एस्सी.
**श्री. भूषण काळे**
**श्री. विलास देवलखकर** बी.एस्सी.
**ॲड्. विकास रेळे** बी.ए.एलएल.बी.
**श्री. चंद्रकांत देऊलकर**
**श्री. पांडुरंग पोखरकर** बी.एस्सी
**श्री. किरण ब्रह्मे**
**श्री. सुधीर मिठबावकर** बी.एस्सी.बी.एड्. (स्वीकृत सभासद)

**अंतर्गत हिशेब तपासनीस**
रविराज नाखरे बी.कॉम्.

**सनदी लेखापाल**
मे. एस्. एस्. नायक आणि कं.